डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

# कृषि महाविद्यालय, दापोली, जि.रत्नागिरी

जा.क्र.कृमविदा/आस्था/अ–१/५५२८/२०२२, दिनांक : 19 DEC 2022

## जाहिरात

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत कृषि महाविद्यालय, दापोलीच्या आस्थापनेवरील **'वैद्यकीय अधिकारी'** हे पद रूपये **३०,०००/– (रूपये तीस हजार)** मात्र द.म. एकत्रित मानधनावर ठेका पध्दतीने भरावयाचे आहे. सदर पदाकरीता इच्छूक उमेदवारांनी **सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी** या कार्यालयात या जाहिरातीच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत अर्ज सादर करावेत. त्याबाबतच्या शर्ती व अटी खालीलप्रमाणे आहेत.

१. सदर पदाकरीता M.B.B.S./B.A.M.S. degree recognized by the Medical Council of India/State Government ही शैक्षणिक अर्हता विहित करण्यात आलेली आहे. निम्नस्तरीय शैक्षणिक अर्हतेच्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.
२. सदर कामाचा ठेका निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाचा असून त्याचा कालावधी ११ महिन्यांचा आहे.
३. उमेदवारास त्याचा ठेका संपण्यापूर्वी काम सोडायचे असल्यास त्याने तशी आगाऊ सूचना न दिल्यास त्यांच्याकडून १ महिन्याच्या ठेक्याची रक्कम वसूल करण्यात येईल.
४. या आदेशान्वये ठेका पध्दतीवर घेतलेल्या सेवा कोणतीही पूर्व सूचना न देता समाप्त करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.
५. वैद्यकीय अधिकारी यांनी विद्यापीठाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या दवाखान्यात दररोज सकाळी १०.०० ते १.३० व सायंकाळी ३.३० ते ६.०० या वेळेत साप्ताहीक व कार्यालयीन सुट्टया धरून विद्यापीठ अधिकारी/कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय आणि विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना वैद्यकीय सेवा पुरवावयाच्या आहेत. याबाबत विद्यापीठ अधिकारी/कर्मचारी, विद्यार्थी यांचेकडून तक्रार प्राप्त झाल्यास त्यांच्या सेवेचा ठेका त्वरीत समाप्त करण्यात येईल.
६. वैद्यकीय अधिकारी यांचेसाठी सकाळी १०.०० ते १.३० व सायंकाळी ३.३० ते ६.०० अशी वेळ जरी निर्धारित करण्यात आली असली तरी आकस्मिक व तातडीच्या प्रसंगी वैद्यकीय अधिकारी यांना विद्यापीठातील रूग्णांना कोणत्याही वेळी वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतील. तसेच वैद्यकीय अधिकारी यांना दापोली मुख्यालयी वास्तव्य करणे बंधनकारक राहील.
७. सर्वोच्च न्यायलयाने निर्धारित केलेल्या याचिका क्र.एस.एल.पी–५४५३/९० च्या निर्णयाच्या अनुषंगाने ठेक्याच्या कालावधीनंतर विद्यापीठ सेवेत कायम स्वरूपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.
८. या आदेशातील अटी व शर्ती मान्य असल्यास त्याप्रमाणे हमीपत्र रू.१००/– च्या स्टॅम्प पेपरवर लिहून देऊन संबंधित उमेदवारांनी ते हजर होतेवेळी सादर करावे. तद्नंतर ही नेमणूक कार्यान्वीत होईल.
९. सदरचे पद कायम आस्थापनेवर भरल्यास पूर्व सूचना न देता सेवा खंडीत करण्यात येईल.

तसेच वैद्यकिय अधिकारी या पदासाठी अनुभव आणि स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल. इच्छूक उमेदवारांनी आपली वैयक्तिक माहिती शैक्षणिक अर्हतेच्या प्रमाणपत्रांसह निम्नस्वाक्षरीकार यांचे कार्यालयास दिनांक २/१/२०२३ पूर्वी सादर करावी.

सहयोगी अधिष्ठाता

कृ.सा.प.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

# कृषि महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी

दिनांक रोजीच्या विद्यापीठ जाहिरातीला अनुसरुन करावयाचा अर्ज.

उमेदवाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो

## अर्जाचा नमुना

१. जाहिरातीतील ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नांव :

२ अर्जदाराचे संपूर्ण नाव :

३ सध्याचा पत्रव्यवहारासाठी पत्ता :

४ कायमचा पत्ता :

५ दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्र. :

६ जन्मतारीख (अंकी व अक्षरामध्ये) :

७ अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकाच्यावेळी असलेले वय : वर्षे महिने दिवस

८ धर्म/जात :

९ शैक्षणिक अर्हता :

| अ. क्र. | उत्तीर्ण परीक्षेचे नांव | बोर्ड/विद्यापीठ संस्थेचे नांव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | वर्ग/श्रेणी | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१०) अनुभव : वर्ष महिने दिवस

| अ. क्र. | नियुक्त्याचे नांव | धारण केलेले पद व वेतनश्रेणी | कालावधी | | | | | नोकरी सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून (दिनांक) | पर्यंत (दिनांक) | एकूण कालावधी | | | |
| | | | | | वर्ष | महिने | दिवस | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

११) उपरोक्त पदासाठी अन्य काही विशेष प्राविण्य अवगत असल्यास त्याबाबतची माहिती :

मी श्री/श्रीमती........................................................ असे लिहून देतो/देते की, वर दिलेली सर्व माहिती बरोबर असून ती सत्य आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास उपरोक्त पदासाठी मी अपात्र होईन याची मला जाणीव आहे.

उमेदवाराची स्वाक्षरी

टिप : अर्जासोबत जोडण्यात येणाऱ्या सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती सत्यप्रत केलेल्या असाव्यात. जर प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती स्वयंसाक्षांकित केल्या असतील तर शासन निर्णय क्र. प्रसुधा/१६१४/३४५/प्र.क्र.७१/१८–अ, दि.०९.०३.२०१५ अन्वये विहित नमुन्यातील स्वयंसाक्षांकनाचे स्वयंघोषणापत्र सोबत सादर करणे आवश्यक आहे.

कृषि ज्ञान व्यवस्थापन केंद्र